


**संपादक :- ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)**

**संपादक मंडळ:- सायमन रॉड्रिग्ज (९२२५६२३५७५),**
**सुनिल डिमेलो (९७६७०१५२९७),**
**डॅनियल मस्करणीस(९१५८९८६०२२),**
**एडवर्ड डिसोजा (९००४०३७९५०)**

**Email :- kadodivasai@gmail.com**

**Web :- www.onevasai.com**

**मुद्रक :- मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६४८७४४९३**
**मुखपृष्ठ :- डॅनियल मस्करणीस**

## अनुक्रम :-

**संपादकीय**
**कादोडी भाषा कादो बोयली पाय?**- सायमन रॉड्रिग्ज
**कुपारी.कॉम** - डॅनियल मस्करणीस
**पाखडान** - तेरेजा डिसोजा
**कुपारी (कविता)** - सुनिल डिमेलो
**बोल मरे बोल (कविता)** – राजन डिमेलो
**कोलावरी डी इन कादोडी. (कविता)** - स्टीफन वाझ

# संपादकीय

सब्बान कादोडी मित्रमैत्रिणींना यो कादोडी भाषेमिनसो पयलो अंक सादर करताना मन बो खुष जाले. आह्मा हांगात्यात, दर बारा कोसोर भाषा बदलाते. भुईगाव ते आगाशि या आपल्या कादोडी भाषेआ पट्ट्यात वेगवेगळे उच्चार आयक्या मिळात्यात ( उदा. भाहालो – विहारलो, अडे – आडे, त्याआ – त्यानसा ई.) तरी पण आपली एक वायलीस ओळख, आपलो यो कादोडी भाषा बोलणारो सामवेदी कुपारी समाज ठवोन हाय.

भुईगावश्या नतिशा कव्र्हालोने ***I BET I CAN UNITE 10,000 KUPARI PEOPLE ON FB*** यो ग्रुप सुरू केले, आन आतेपर्यंत सव्वाचार हजारापर्यंत त्यायी सदस्यसंख्या झाले. आपल्या खुपश्या पोरामिने चांगले गुण हात पण त्यांना आपल्या समाजात पाय तोहो वाव मिळे नाय. सुनिल डिमेलोने आपल्या या समाजाव यो जो ग्रुप हाय त्यावर सगळ्या साहित्यप्रेमी कुपारीना एक आवाहन केला की ओहो एक मंच अह्या पाय जडे आपल्या पोरांमिने अहलेली प्रतिभा दाखडता येदे. त्याई महिन्याला एकत्र येवोन नवीन का वाशिला-लिविला, यावर चर्चा कऱ्या करतान “कुपारी कट्टा” इ कल्पना मांडिली. त्यानंतर 26 फेब्रुवारीला आगाशी क्रॉस नाका अडे सायमन रॉड्रिग्जश्या घरा पयली सभा जाली. आन तडे आपल्या अडने बरेस जण आलते. त्या सभेमिने एडवर्डने आपल्या कवितेया वाचन केला, शेवटला ॲड. जॉन रॉड्रिग्ज(आगाशि) याई कोर्ट-कायदे आन त्यापासून आपल्या समाजाला फायदो कहो करोन घेता येदे याविषयी खूप मस्त आह्मा मार्गदर्शन केला.

त्यानंतर दुहरी सभा सुनिल डिमेलोश्या घरा, वटार आडे अकरा मार्चला जाली, त्यावेळेला औपचारिक ओळखतन झाल्योर डॅनियलने त्याई ‘ती’ कथा वाशिली , एडवर्डने, त्याई पहिली लिविलेली आन फादर दिब्रिटोने वाखाणलेली कविता वाशिली, सायमनने सिंगापूरला अहलेल्या जॉन्सन लोपीसश्यो कविता वाशिल्यो, त्यानंतर एकमेव लेडीज तेरेजा डिसोजाने “वरमाय” यो लेख वाशिलो, या वेळेला एक ओहो विसार पुढे आलो की आतेपर्यंत आपुन आपल्या मिनश्या मराठी भाषेमिने लीविणाऱ्या आन चांगला कय वशिले हायदे ता शेअर कऱ्या करताना एकत्र जमत्याव मग त्यास बरोबर आपल्या कादोडी भाषेकरता कय केला पाय आण आह्मा ठरविला की आपुन कादोडी भाशेमिनेस एक ई-अंक काढयासो, ३ ऱ्या सभेत तो एक मुख्य विषय घेवोन तो उपक्रम तडीस न्यासा ठरविला.

तिहरी सभा डॅनियल मस्करणीस श्या घरा वाघोलीला २५ मार्चला झाली, या सभेत मुख्य मुद्दो “कादोडी” यो भाषेमिन्सो पयलो ई-अंक काढण्याविषयी चर्चा झाली, आन सगळ्या सूचन्योर विसार करोन या अंकाई रूपरेषा ठरविली, यो अंक ईस्टरश्या दिहा प्रकाशित कऱ्यासा ठरला. यावेळेला पण लेख, कविता आन चारोळी वाचन जाला. यानंतर म्युझिक सेशन होता, त्याला खरी रंगत आली, ॲनसन तुस्कानो, डॅनियल, सायमन, राजन याई खरोखरीस आपल्या समाजामिने कोडा टॅलेंट लपल्याला हाय ई दावडोन दिला. आतेपर्यंत सायमन रॉड्रिग्ज, एडवर्ड डिसोजा, राजन डिमेलो, ख्रिस्तोफर रिबेलो, रॉबिन्सन डिमेलो, मॅकविन डिमेलो, मॅक्सवेल तुस्कानो, मिनिन ट्रवासो, सुनिल डिमेलो, लॅन्सी डिसोजा, ब्रिजेश रॉड्रिग्ज, निक्सन रॉड्रिग्ज, आग्नेलो दोडती आन तेरेजा डिसोजा ओड्या सदस्याई हजेरी लाविले

अंकात किंवा सभेला फक्त साहित्य, कला आन संगीत या विषयोर भर आहणार हाय, राजकारण किंवा धार्मिक विषय चर्चिले जाणार नाय. त्यासप्रमाणे आपल्या कादोडी भाषेआ संवर्धन जास्तीत जास्त कहा करता येदे यावर भर दिलो जायदे, आपल्या भाषेमिन्शे अस्सल शब्दाओ (माकून, भगून हारखे शब्द) संग्रह सुद्धा कऱ्यासो विसार हाय.

कायिक वेळेला चांगल्या कलाकृतीला आपल्या आडे चांगली दाद किंवा प्रतिसाद मिळे नाय, आपल्या समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात खूप आह्मा टॅलेंट हाय, त्याला योग्य तो वाव मिळवोन द्यासो प्रयन्त्न आमी करणार हात, पन आमी फक्त सुरुवात केले, फक्त ४-५ जन एकत्र येवोन फायदो नाय, आपुन सगळे मिळोन पुडे येवो आन आपल्या कादोडी भाषे करता कय तरी करोन दाखडो. आपल्या या पयल्या अंकात कई चुको जाल्यो हायद्यात ते समजोन घ्या.

**ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा**

# कादोडी भाषा कादो बोयली पाय?

स्पेन मिने एक म्हण हाय, त्याव अर्थ ओहो हाय की “ज्याला कुणाला आपली मातृभाषा बोलता ये नाय, त्या हारको मूर्ख माहणू दुहरो कुहनोस नाय”. आपल्या समाजात आपुन बगीत्याव गेल्या २०-२५ वाहरामिने आपुन आपल्या पोराहरी आपली भाषा बोलाव नाय, आपुन भाषा कुहणी बोलत्याव ते “मराठी”. गम्मत म्हणजे आपल्या अडे बहुसंख्य लोकांना शुद्ध मराठी बोलता आण लीविता ये नाय, ओडी मराठी भाषा कठीण हाय. मराठीत पाणी सो “ण” आन नळासो “न” किंवा षटकासो “ष” आणि शहामृगासो “श” या मिनसो लीविण्याव होडोन द्या, पण उच्चारामिनसो का फरक हाय ता आपल्याला एनआयटी माईत नाय आन आपुन, आपले जुने माहणे त्या पोरांहरी धेडगुजरी मराठी बोलात्यात आन भोटे झाले गा ते पोरे जी कय भाषा बोलत्यात ती नाय धड मराठी नाय धड आपली कादोडी, आहा झालेला हाय.

तुमे हांगेद्या, मंग का फरक पडाते “ पोरे इंग्लिश मिडियम मिने हिकात्यात, शिक्षाण घेवोन चांगले कामाला जात्यात, आपल्या भाषेशिवाय त्या का अडयासा हाय?”, आपल्या मनामिने एखादो विसार येते, एखादो प्लान हवाते, “ मला परवा अमुक एक माहणाला जोवोन भेट्यासा हाय, त्याला अमुक एक कय हांग्यासा हाय, यो जो विसार तुमशा मनामिने येते, तो कुहन्या भाषेमिने येते?, मराठी मिने येते गा इंग्लिश मिने येते गा आपल्या कादोडी भाषेमिने येते? त्या माहनाहरी का बोल्यासा का कऱ्यासा इ जरी तुमे तडे जावोन इंग्लिशमिने नाते हिन्दी, मराठीमिने बोयले तरी पण तो प्लान तुमशा डोक्यामिने कादोडी भाषेमिनेस तयार होते आण मंग तो इतर भाषेमिने बदललो जाते. आन तुमे तुमशा मातृभाषेमिनेस खूप चांगल्या परकारे विसार करू शकात्यात इ खूप कय अभ्यासाअंती सिद्ध झालेला हाय. आपल्या पोरांना आपुन कुहन्या भाषेमिने विसार कऱ्यादो लावणार हात? मराठी गा इंग्लिश! ती पण धड शुद्ध नाय.

अजून एक महत्वाव मुददो, “ आपल्याला कुणे मराठी, हिन्दी, इंग्लिश बोल्यादो हिकविला?, शिक्षणाने ना? आन आपुन बायेर पडले तिगाला आपुन हिकलेस ना? तहेस आपले पोरेपण बायेरश्यो भाषा हिकेद्यात. सगळ्यात वाईट गोष्ट वाटाते ती या गोष्टीयी की ज्या भाषेमिने आपुन जन्मले ती भाषा आपल्याला बोल्यादो आन आपल्या पोराहरी बोल्यादो आपल्याला लाज वाटाते, आज ट्रेन मिने आपल्या लोकाये ४-५ जने मराठी नाते हिन्दी मिने बोलात्यात ई बगोन खूप वाईट वाटाते. तुमे माला ४ गुजराती, बंगाली, मदराशी, केरळी किंवा मारवाडी त्यायी भाषा होडोन इतर भाषेमिने बोलताना दावडा.

अजून वेळ गेल नाय. आपले आजशे २०/२५ वहाराये पोरे जे मराठी बोलत्यात त्या हरी आपली भाषा बोल्यासो प्रयत्न केलो ते त्यांना ती मस्तपैकी बोलता येदे. त्या हरी आपली भाषा बोल्यादो सुरुवात करा. आपल्या आडे खुपशे उदाहरणे हात की बायेरश्यो आलेल्यो नवऱ्यो (नगर, कोळी, मुंबई, कोर्लय) आपली कादोडी मस्तपैकी बोलात्यात, तर मंग आपले पोरे, ज्या रक्तामिने आपली भाषा आन संस्कृती हाय ते तर बोलनारूस. आपलो कुणही माहणू दिखलो आन तो तुमशा हरी कुहण्याही भाषेत बोयलो तरी आपुन आपलीस भाषा बोला. कायिक वेळेला मंजे चर्च, शाळा आन ऑफिस या ठिकाणी तुम्हाला मराठी नाते इतर भाषेत बोलना बरबर हाय.
आपुणूस आपली भाषा जप्या पाय आन वाडव्या पाय.

**सायमन रॉड्रिग्ज, आगाशी**

# कुपारी.कॉम

आज, इंटरनेटमुळे जग खुप बदल्या लागले. या इंटरनेटवर फेसबुक नावाशी एक वेबसाईट किंवा गम्मत हाय. यावर आपून जहे लोकांना बार भेटात्याव तहास अडे पण भेटू शकत्याव. म्हंजे प्रत्यक्ष नाय, पण आपल्या कॉम्पुटरवरने त्या दुहऱ्या कॉम्पुटरवर अहा आपून बोलू शकत्याव. आणि फेसबुकवर कुणाला जर आपल्या अगोदाश्यां मित्र-मंडळीना शोध्यासा हायदे तर ता आपला भाटसा बन्ना वाळन्यापेक्षा पन सोप्पा जाले, या फेसबुकमुळे खुप जणांना त्याये अगोदरशे शाळीश्शे, कॉलेज मिन्शे किंवा आपल्याअड्शे कुपारी मित्र मिळाले, पन अडे फक्त गंमती-जमति कऱ्यादोस जमात्यात आहा नाय हा. अडे वेगवेगळ्यो संघटना पन हात.

आपून पन आपल्या कुपाऱ्यायी एक संघटना स्थापन केले. आपली ई संघटना स्थापन केलेल्या आते एक वहरी पण होवेदे, आपून या संघटनेत फक्त कुपारी कोपात आन कुमारी यान्नास घेत्याव. वसईशे वाडवळ पण नाय, फक्त कुपारी.

या ग्रूपवर भूईगाव ते आगाशी मिन्श्या सगळ्या गावामिन्शे बहूतेक तरुण मंडळी हात. आज जवळ-जवळ ४००० पोराटा यावर हाय. याये फायदे जाम हात, आते भूईगावश्या जोएलश्या भाटात पांढरे कांदे मस्त जाल्यात ई अमेरिकेला अहलेल्या दादाला आन त्या आगाशीला दिलेल्या ताईला आणि आम्हा सगळ्यांना एका सेकंदात कळाते. कहा? तर त्याने ता या ग्रूपवर लिविल्यामुळे किंवा फोटो टाकोन हांगील्यामुळे. तहास कुहुन्याही विषयाई कुहुनीही माहिती पायदे हायदे किंवा नोकरी, काम-काजाविषयी कय विसऱ्यासा हायदे तर अडे फक्त लिव्यासा खोटी बास, त्याला एका मिनिटात आपल्यास पोरांदरने उत्तर मिळाते. आते तीगाळश्या घतीन फोनतन कऱ्याशी गरज नाहाते, अडणे आपल्या पोरायी खुप गरजू लोकांना मदत पण केले हा... आपलो कुपारी समाज, आपल्यो साली-रिती याविषयी आपले तरुण पोर-पोऱ्यो खुप आहा अडे लीवित्यात.

आपून आपल्या कुपाऱ्याओ ओबडयो म्हणी, तिगाळशे जुने शब्द, आपला पारंपारिक लगीन, तिगाळसा राहणीमान, याविषयी जाम बोलात्याव. आपल्या कादोडी भाषेस्सा पण जाम मायिती पडाते. त्यामुळे आते नानभाट शाळीत ईंग्लिश मिने हिकलेल्या पोरांना "तळ्योरसा पोन्या काढोन मिंगरसा निखूरला घेवोन ये" आहा हांगीला म्हंजे आते त्यांना आपल्या बयने का काम हान्गिले ता कळाते. जह्यो बऱ्यो रिती हात तह्योस वाईट रिती पण आपल्या अडे हात आणि तो आपल्याला पाडयाशो हात याविषयी पण आम्ही चर्चा करत्याव, यामुळे खुप फायदे हात. चर्चा पण हवाते आणि आपल्या तरुण पोरा-पोरींना हुमज पण येते.

या ग्रूपवरशे आम्ही कय मेम्बर्सने 'कुपारी कट्टा' स्थापन केले आणि आम्ही महिन्यातने एकदा भेटात्याव. आते ई मात्र खराखुरा प्रत्यक्षात भेटणा हा. आमि विसार केलो, ओडा अडे फेसबुकवर सगळा मस्त घडाते तर यामिन्सा निवडक जा जा चांगला हाय ता एका अंकात प्रकाशित करोन आपल्या बी इतर कुपाऱ्यापोत पोस्वो. दोन-तीनदा भेटले आणि एका महिन्यात यो पयलो अंक आते प्रकाशित जालो सुध्दा. यो अंक, कुपारी संस्कुती, कादोडी भाषा, आपल्या सामाजाश्यो बऱ्यो-वाईट रिती आणि यावर फेसबुकवर झालेली चर्चा तुमश्या पोत पोशव्यासो प्रयत्न करदे.

आणि या अंकाइ भाषा तुम्हाला आतेपोत कळलेस हायदे, फक्त कादोडी. आला लक्षातु??

**- डॅनियल मस्करणीस वाघोली**

# पाखडान

बय आन भोटीबय, दोगी देवळा जावोन आल्यो आन हांग्या लागल्यो. देवळोर फादरने हांगिला पुडसो आयतवार रामाऑ आयतवार हाय. दुहऱ्या मीस्साआदी हावळया पात्याला बेजिमात कऱ्यासा गा मंगू पिरसाव, बरबर देवळात मिस होयदे.आन बी का मायती हायगा, हुकुरवारे दुखीमावलीऑ पास मंगू कोमसार, बारसे फादर यासे हात. आतें आमें सगळ्याई आयकिलता पान बयला आन भोटीबयला उताळी आवरेस नाय. पाखडान करॉसा हाय. मंगू कत्ये करॅसा. बिशितवारे आमश्या शाळीला हुटटी हाय आमाला कालुस तेरसबाईने गा आन दमेल गुरूजीने हांगिल्ये बिशितवारॅ बाईसो पाट हाय. तहयो दोगी तोडे लाम्बे रुन्दे करोन आहया लागल्यो. बुधवारॅ हांजपासून यांई सुरवात जाली, हाकोटे लवकर उठयासा काळोखाइस.

बय पाच वाजल्यापासून आडयाआ लागली. निम्बार हव्याश्या आदी पाखडान जाला पाय. उठा सला, अय हिनवरे, अय बुधवरे, उठा ना.. आयक्या ये नाय गा. निम्बार याश्या आदी पाखडान कऱ्यासा. आमे कय उठात नाय, तहो बयने तांब्यात पाणी हाडोन आंगोर टाकिलो. आमे इ आयला बयला गाळी देत, डोळे सोळीत उठल्यो. सूलीमेरशी हेण्याइ राखडीय दात सोळा गा सूलीरसो तापलेलो पाणी पशंडीत घेवोन तोंडे धवा. पाच वासता श्या कॅल्ये, सुलीआ तोंडोर हाय. पानेरीओरसे पेल्यात श्या घेवोन पेटुल्यावरशा निखुर्लीत बटर गा बोटे काल पाववाल्यादरनें घितल्यात ते बुडवॅान खा, जालो गा श्या पेवोन, या आते.

हाकोटे स वासता :- बय : आथुणे पागुणे दुळा, मिंगारा ठवा. आथरी, गोणटे, कोथळे, कांबळी, वाकळो, काथ्याय गोदडयो पडाळयोर गा मिंगारा हुकात घाला. पानेरीओरसे सगळे ठाय, हान्डे, पशन्डे, बारक्यो पशंडयो बाइयोर ठोवा. शिशाई मुजी, मिठयाइ बान्डी, तीजाला, भाताव पराडो, कोलम्बाई बर्णी, मसाल्याव ठाव भाताआ कळग्यामॅरॅ ठवा गा, त्योर गोण्टये टाका. आडे, कावड, मुहाळे मिंगारा ठवा. सुलीपुडसा पेटुला हस्तेस बार काडा. डाळीयो पुडयो. हाकर, भुखी, बटर, खाऱ्यो, तॅलायो कुप्यो, साऊळ, वाटूळयो, झांजर हाय. पेटूला दोगांइ तुकीला त्ये त्याला खाल्ने ढोसो पडलोतो त्यातनॅ उंदटयो बार पडल्यो, तहास पेटूला टाकिला. तॅलाई कुपी फुटली. कुडयाला गासलेटसो दिवो कंदयो काडा. ओहरीशो खाटयो काडा गा पायके वर करा पाय्कॉर हुक्के हाले ठवा मग दोपरशी मजा बगा.

६.३० वासताः अय हिनवरे, तडे कोंबडी मांडिले जाव नाका डोख्योर भ्ययदे. तरी पान कोंब्डीने हुरान मारला आंगा टोपला केला आन कॉ..कॉक लाब गेली तहॅस दोनी हळांब्ये काडोन निम्बात ठविल्ये पान आखो हात भरलो तुई कोडी. बी सगळा सामान उखांडया झापात भरॉन मिंगारा ठविला.

७.०० वासताः मिंगरा सूल लावा भोटया तपइल्यात पाणी भरागा  सुलीओर ठवा. सुलीत माडाय प'रॅ खाखाडया कासूल्या घालोन माडॉरॉर गा हावळयॉव पात्योर गासलेट टाकोन सुल जळती करा, आखा घर रिकामा जाला . डोख्याला पोण्यॉव हुडकॉ पोतंडीसा लांब्या हाताआ बाबा फाटलेला खमीस घायला गा आन कमरॅल्या धडक्यॉव हुडको घॅवॅन पोंदात टायलीन खोशिली आन लाग्ल्यो पाखडॉदो. दोगी धाडल्यो ठाय सोळया बाइओर. एक सडली बुडीघतीन माळोर. परश्यावहरॉय हाले खाखाडयाई गुन आन माडा आम्ब्या पासरी खाला टाकील्यो. कळगो उल्टो फिरविलॉ. ओहरीत भुसो सग्ळो खाला पडलो. खराटयॉ हालटयाय बारला त्योर हावळयापात्या ओजा हाले खाखाडयाई गुन आन माडा आम्ब्या पासरी हारक्यो ठविल्यो. आन गिराळीहारकी खाला उतरली.

८ वासताः आहरीत पाखडयासा हाय त्याआदि सुलीओरसो पशॅडयात पाणी घ्यागा त्यात दोन आण्यॉव धोबीखार हाडल्ये तो घाला सग्ळा कथान कुबॅटये वाकळी सितरंगी भिजात घायले.ओहरीसा पाखडाानाला लांब्या हाताव हाल्तो घॅवॅन कवलोरसो गा कुडयोरसो धुमो हुतॅरॉ काडलॉ गा ओटयोर राहा मारली.

८.३० : मग सुलूपुडयेः ओटुली बारकी त्योरने पाय निहारलो  पाना जाला का हातातु लांब्या दांडीओ हाल्तो होतो तो टेकिलोन उबी रली.सुलीपुडे बगोनुस डोळयोर जाळ आले. सगळो कुड काळोमस. टोकरॉर उकंदयोर हुतत्रो कोडो. कवले पाखडले कुड साप कॅल्यो कुडाला भोके पडले.सुलीआमॅरशी राखडी भरली. भान्शीओर हालतो मारलो तॅ तडेशी नान्द कुने तुकिलीस नाय. वाळनाराखालश्या नान्दीत रातीइ पॅज होती नान्द टुक्या गेली तॅ नान्दीऍ दोन तुकडे जाल्यात बगित्ये तडे तॅ त्योर वरटयो पडल्योतो. नान्द फुटली पॅज होळळी कामात काम वाडला. पाटो मिंगारा आन वरॅटया नान्दीओर. आख्ओ कातवार हेणा टोपल्यात भरॅन हेणखळीओर टाकिलॉ.

९.०० वासताः आत्या लागा ओटयोरने पोपडॅ काडयादा. ऐळीयॅं पोपडे काडल्ये. आन यो दोगी हेण हाडयादो गेल्य्ओ.सोनीदादीला. मरश्याला काला हांगोन ठुइलता तुमश्या बइला पांडरादुद हेन हाकाळ हारव्यादो ठोआ पाखडाान हाय. हेणा टोपला ठोविला मिंगारा गोठया मॅरॅं.

९.३० : बय आमशी वाट बगितीस हाय. एक खपला गा दुहरा इआ तयारूस हाय बग.इआ काम खपॅसा नाय आन इला विहांम्बोस नाय, बयनॅं हाग्लिा पोपडॅ काडोन जाल्यात हायदे त्यॅं पानी मारॉन ठोआ.हारव्यादो बरा होयदे. सला आत्ये पानी मारलॉं आत्यतरी हुटल्यो.

बयः सुलीओरती कणेरी जाले. उळकीयॅं थाळीत घ्यॅवॅन प्या  बी कामॅं हात.यो दोगी बाईबुडा कथान धोवॅंदयो गेल्यातू बाइबुडा आवाज यॅतॅं. यो दोगी कुनाहरी मारॉ करदयाद गा. अजून आल्यो नात अवदासा हात. कथनाला उबॅंआडवॅं घाय मारलॅं मळ कोडो निंगालो मग निताळकास पान्योरने ओळोन काडला.  कथान धवला गा तळयोर हिवारात शिराळयाआ मांडवॉर  हुकात घायला. दोपारसा दुण्यासा पान हाय हुकल्यॉर.

१०.३० वासता इ मिगारा सुल सालुस हाय पानी तापतोस हाय. उनॅं पान्याआ आंदाण घॅंटला पान सुलीओ एक डव फुटलॅं तॉ कुणाला माइतुस नाय तॅला बारको दगड जोडलो आन आदान ठोइला. तोडयात भुटीबयने आडयोन हांगिला हाकोटपासून पोरॅं कामॅं करत्यात धान कमी नाका वाळळो . टीपरीभर सावळा धान घनास वाळ. धान जाला तॅं भोटी तपइली टुकाते गा तॅंवर हिबा भॅंह नाय वाळताना हातोर पॅंज आली तहास वाळळागा आण हात मुतखालात बुडविलॉं फोडफड आले नाय. जिव्यादो का करॅंसा आत्यॅं. ओ मुबयसो आलो नाय . मॅं हुक्कया बुंबलाआ आटवान करतॅं.धानाई हांडी रीती होयेगनाय. या कथान धवला आल्यो बगा. भय भुक लाग्ले. पॅंजधान हायता खपवा आटवाना हिज्ता हाय. हुक्या बुबला आटवाना वास लिकातॅं गा. तॅं पोटात कागुळे काक्या लागल्यॅं.जीव्यादो दिला कुनाला बुबलाव कुकडयो एकूस तॅं कुनाला बतात्याइ फोड कमी जाले. सिडवित सिडवित जिविले आन मासीत भॅंयलॅं.

१.०० वासताः बाइओर ठाय सोळळयात ठाळयात भरोन पानेरीओर ठोआ. पशाडा हान्डॅं पाण्याय भरॉन ठोआ. मिंगरश्या सुलीमॅरॅं बरण्यो तान फुंदिल गसलेटाइ कुपी जाग्श्या जाग्योर ठोआ हान्शो हापडल्यो पात. बयने सुलीपुडॅं ओहरीत ओटोल्योर हारविला. कण्या कहॅं सोबात्यॉत बगू. कुड कण हारवितॅं. म्यॅं हिरा काडतॅं. कुडाए पोपडॅं निगालॅत त्यामिनॅं थाटॅं भरोन हेनाय हारवीला तॅं का काळोख होव्यासो गा पाान हारविल्योर घर काहा होन्याहारका जाला. सुल  सालुस हाय पानी तापतोस हायः

१.३० : खाटो हेक्याशो हात निमराय खाटो तापल्यात .खाटयोरशा पायकोयोर से हाले काडा. बगितॅं तॅंवॅर भिख्नाई राहा. भिखून रगात पॅवॅन जाडे जालतॅं. मॅंथॅंय मारलॅं कहयॅं टसाटस फुटाटयात बास.हुंबाला लिखो पांडरॉदुद तॅंओ पान फोडल्या टुसटुस आवाज. बायलीत उनॉं पानी भुडयाय उपिलॉं आन खाटॉं हेकिल्यॉं बाक हेकिलॉं.हळांबो हेकिलॉं तुइ निमराय गेलती. न हारविल्यो पान.

२.०० वाजल्यात आतॅं सुल सालुस हाय पानी तापतोस हाय सुल आपता आन खाखाडये भरा. बय आमे खेळयादो जाव गा पाकूघारा खापरीबाय नायतॅं लगोरॉं. आज खेळबिळ नाय हिरा काडल्यॅं नाळाई होय ताटलीत ठुइल्ये शिमटीभर हाकर ताकॅंन खा. बयने लिगरीआ हिरा प्यादो दिला आन हिरा लाव्यादो लागली एक हांगातॅं म्यॅं खेळयासाल्ली बी हांगातॅं म्यॅं पान. अडॅं या हिरा लावोन जा नायतॅं हेन्डी कापिनॅं. हीरा लावॅन जाला, सुलीओरसो पानी भुडयाय उपिलो आन भॅंविल्यो दगडोर पायाबुडा पिंडा ठोइला शिकल जालॅं सगळो मातीओ. माथा धविला आतॅं निमरात उबे रॅं. माथा हुकॅंतॅं तवूस खाटो घरात न्या. खथान हुकलॅं ता दुना मंगु उखांडया खाटयोर निजा कवलात खाखाडयाइ आग गॅवॅन तीवॅर इशाद ताकिला. इशादाई धोरी माथ्याला दिला कॅंडा बरा.

३.०० शा प्यासा टाइम जाले कुनाला शा पाय्दे तॅं हाकोटसो तांब्यात हाय बगा सुलीआ आगीत ताम्ब्यो उनो करा. आन कालसो खोल्यासो पानगो हिख्योर ताटलीत हाय घ्या गा शा प्या.

३.३० : खेळा पान आंग माख्वो नाका. देवळा जासा हाय.कोमसाराला. घरॉं पाखडाान जाला तहास मनापान पाखडान करॅंसा. देवळोर पास वासता जा. बारसे फादर पान यासे हात. रागित मांडी घालॉन फादरला पापे हांगीलॅं फादरनॅं परथाना करॅंदॉं हांग्लि ती पान कॅंली.

बय न भुटीबय दोगीना बरा वाटला. पख्डाण जाला हारवान जाला घरॉं पान तयारी घ्यादो मनापान जाला पाखडान्, लान्या भोटया सगळयाना पास्का हन बरॉं जावदे.

**तेरेजा डिसोजा, गास**

# कुपारी (कविता)

वसयश्या कुपाऱ्याई आजकाल जाम प्रगती केले आहा आयकिले,
नव्यानव्या क्षेत्रात सातासमुद्रापार झेंडो रोविले आहा पान आयकिले.
कुन धंद्यामिने करोडपती,
ते कून मार्केटमीने कमावीते नोटी.
कुनाला मिळाते नोकरीत पॅकेज भारी,
ते कून करते बीएमडब्लू मरसडिझ शी सवारी.
पान खरो कूपारी कून?
करान......
मंबयला करोडोआ फ्लॅट मीने रेते तो कूपारी,
आन् अजुन कुडा भिंतित खितपात पडले तो पान कूपारीस.
लगीन, बाळटीम, बर्थडे आन् सौदियाला धाना राही फुकट घालवीते तो कूपारी,
आन् आज जिव्या कऱ्या कय नाय भगून तांबड्या धानोर भागवीते तो पान कुपारीस.
नोकरी - उद्योगात पावड्यान पैशे ताननारो कुपारी,
आन् शिपवर जाशी ट्राय करता करता 'फुकट' जाते तो पान कुपारीस.
सात-बारा उताऱ्योर फेरफार करणारो टू परसेंट वालो कूपारी,
आन् अरदल जमिनीत खप खप खपणारो पान कूपारीस.
"घरा" बर्थडेला लाखो उडवणारो कूपारी,
आन् पंधरावीनंतर कोर्स कऱ्या पैशे नात भगून वसयला कामाला लागणारो पान कूपारीस.
तोहो मे पान एक कूपारीस हाय,
आन् नुसती कविता करोन कय वळ्यासा नाय
ई पान माला माईत हाय.
पान ई कडेतरी बदलला पाय,
आन् नवीन पायन्डो पाडलो पाय.
कयतरी नवीन करोन दावडला पाय.
प्रगतिये नवनवीन टप्पे नक्कीस गाठिले पात,
पान त्या रस्त्योर ने जाताना मांगे रेलेले खड्डे पान आपुनुस भरले पात.
तीन-चार मजली घरे जरूर बांदिले पात,
पान त्या घरा कूनाला ओळपाट ते होये नाय ना ता पान बगीला पाय.
आंगळात मारिया-येशुए पुतळे जरूर उबे करा,
पान घरातश्या जित्त्या पुतळ्यांना मात्र बाहो नाका.
ई सगळा तुमाला आयकवीला भगून रागावो नाका,
करान......
या सोहळेबाजी आन् दिखव्यापाई रोमन संस्कृती पन गेली लया,
कूपाऱ्याईपान होऊ नये तही गत मनुन पडाते तुमश्या पाया.

**सुनिल डिमेलो, वटार**

---

# बोल मरे बोल (कविता)

हाकोटशी मरी उठली, सुलीपुडे श्या कऱ्या लागली, श्या करता करता अंदऱ्याला हांगाते. ऐकात्या, काल मायारा गेल्ती, आम्शी खार कडे विकली माइतिया ... मा बंधवानेस माला हांगीला, माव पण वाटो काड्यासो, ता आयकोन अंद्र्या हाय कडे ! लगेस गेलो, उहयाखालसा ता पत्र फाडोन टाकीला, मरीवरसा प्रेम एकदम उफाळोन आला आणि जोरात गानो बोल्यादोस त्याने सुरुवात केली. त्या गाण्याये बोल अहे होते....

अंद्र्या : बोल मरे बोल, तूआ मा वर कोडा प्रेम हाय....(2)
मरी : मिंगरशी बाव जोडी ओन्डी हाय,
दापुड्सो नारळो जोडो उस्सो हाय, मा तू वर ओडा प्रेम हाय.....

बोल मरे बोल .......!

अंद्र्या :- वैशाखाशी तू मायारा जाशी, मायी राती-राती नीज नाय लाग्याशी....(2)
मरी : मा बंधवा माला वारना हाय, मायारा माला गेलास पाय....(2)
अंद्र्या : तू पटकन जाय आन पटकन ये,
माला हारोडसा रेवाळा खावोन दे..

बोल मरे बोल .......!

**राजन डिमेलो, आगाशी**

## कोलावरी डी इन कादोडी. (कविता)

खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
साल व्यवस्तीत ?
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
शांत रया , आवाज नाका
हाकोटे हाकोटे दोपारा तीपारा
काते खोले ते काते बोंडे
दिख्यादो म्ये साधो पण मांगे म्ये सोर.
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
आपल्या ते आपल्या पण दुहारया भाटाशे खोले कापिले रे
खोले ते खोले जा मिलदे ता कापिला रे
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
ई कय सोपा काम होता गा रे ,
खोले कापता कापता मार पण खालो रे.
बा बा बाबा बा बा बाबा बाबाबा बाबाबा
बोठ्या बोठ्या बाबो तू तयार!! एक दोन तीन चार !!!
बाबो साल साल बदलाते
बाबो साल म्युझिक पान बदलाते
फक्त कुपारी आते
हातात गलास , गलासात दारू न बरफ
डोळ्यात आन्हू , नुसते आन्हू
एकटा जीवन , मरीकाकय आली
प्रेम प्रेम नुसता जीवापाड प्रेम
तूस सोपने दावडले ना
तूं आ मनातूस खोट हाय
होडोन गेली माला कायमशी
माई गोष्ट तुमाश्या सगळ्या करिता हाय
मा दोस्तानो आपल्या हातात कैस नाय.
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !!
खोल्यावारी खोल्यावारी संसार केलो रे !

**स्टीफन वाझ, बोळींज**

---

## संपर्क

आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान खालश्या ई-मेल आयडी वर ई-मेल करा

**संपादक मंडळ :-** kadodivasai@gmail.com

## अभिप्राय

आपलो या अंकाविषयी अभिप्राय जरूर नोंदवा, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा.

## आभार

फेसबूकवर (I BET ग्रुपवर) या अंका नाव ठव्यादो मत देणाऱ्या त्यासबरबर चांगल्यो सूचना देणाऱ्या सगळ्या कादोडी बंधु-भगिनींशे आम्ही खूप आभारी हात.

---

## सूचना:-

कादोडी या अंकाव दुहरो अंक संझ्यावश्या हणादिहा, २४ जूनला प्रकाशित होणार.
या अंकात तुम्हाला लेख कविता आहा काय साहित्य धासा हायदे ते १ जून पर्यन्त kadodivasai@gmail.com मेल करा. किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.